जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पा.अ.र/९६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक:- 02 MAY 1997

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पुणे विभाग पुणे

प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका
प्राथमिक शिक्षण मंडळ

विषय:- सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत माध्यम - मराठी

संदर्भ:- शासन शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. खाशाअसं १०९६/ प्राशि-३ दि. ३१/३/९६

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे आणि समक्ष भेट देऊन सोबतच्या विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाले नंतर संबंधित संस्थांना परवानगी देणे/ न देणे या बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

(१) संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी. केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

(२) संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

(३) सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

(४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

(५) संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

(६) संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नाव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

..२..

[७] शासनाचा मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु.१००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

[८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

[९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

[१०] सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.

[११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.१० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१२] शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही. या बाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.१० च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र देणे आवश्यक आहे.

[१३] संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे, त्या वर्षी संस्थेने शाळा सुरु न केल्यास शाळेच्या नुतनीकरणासाठी अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शाळेस द्यावयाची परवानगी आपोआप रद्द करण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

वरील सर्व अटींच्या पूर्ततेचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेनंतरच पुढील आदेश निर्गमित केले जातील.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत:-
[१] मा.अवर सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,
विस्तार भवन, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सादर.

[२] मा. शिक्षण संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
यांचेकडे माहितीसाठी सादर.

[३] प्रत, सचिव/अध्यक्ष
संबंधित संस्था आदिनाथ शिक्षण प्रसारक मंडळ
भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे.